# अहवाल: टिळक आयुर्वेद महाविद्यालयास पुणे , म. न. पा. आयोजित स्पर्धांमध्ये पारितोषिके प्राप्त.

## दिनांक 14 , 15 फ़ेब्रुवारी 2026

पुणे महानगरपालिका वृक्ष प्राधिकरणातर्फ़े आयोजित 44 व्या फ़ळे, फुले, भाजीपाला प्रदर्शनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उदघाटन शनिवार दि. 14/02/2026 रोजी महानगरपालिका आयुक्त, पुणे मा.नवल किशोर राम यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनामध्ये टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या द्रव्यगुण व वनस्पती उद्यान विभागाने वनौषधी उद्यान स्पर्धा, औषधी व सुगंधी कुंड्या संग्रह, वृक्ष संवर्धन व संरक्षण इ. स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला.

या स्पर्धांमध्ये टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या द्रव्यगुण व वनस्पती उद्यान विभागास खालीलप्रमाणे पारितोषिके मिळाली. आणखी काही बक्षिसे मिळायची बाकी आहेत.

1) औषधी वनस्पती संग्रह प्रथम क्रमांक
2) सुगंधी औषधी वनस्पती संग्रह यास प्रथम क्रमांक.

या प्रदर्शनानिमित्त टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या द्रव्यगुण विभागाने **‘पिंडी ते ब्रह्मांडी’** असा विषय घेत मनुष्य अवयवायंवर उपयोगी तत’सम दिसणार्या औषधी वनस्पती द्रव्यांची माहिती व महत्व चार्टस प्रत्यक्ष नमुन्याच्या माध्यमातून प्रदर्शित केली होती. या निमित्ताने आरोग्यदीप दिवाळी अंक 2025, सवलतीच्या दरात उपलब्ध करण्यात आला होता . या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्कृष्ट प्रतिसाद लाभला.

माननीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार याच्या आकस्मित निधनामुळे संभाजी उद्यानात आयोजित बक्षिस वितरण समारंभ पुढे ढकलण्यात आला आहे.

या प्रदर्शनास महानगरपालिका आयुक्त, पुणे मा.नवल किशोर राम, महापौर मा. मंजुषा नागपुरे, सहाय्यक आयुर्वेद संचालक मा. डॉ अनिता कोल्हे, उपप्राचार्य डॉ. मिहीर हजरनवीस, डॉ. इंदिरा उजागरे, तसेच पद्व्युत्तर विद्यार्थी, महाविद्यालयातील अध्यापकेत्तर कर्मचारी यांनी भेट देऊन कौतुक केले.

या प्रदर्शनात व स्पर्धांच्या आयोजनात द्रव्यगुण व वनस्पती उद्यान प्रमुख डॉ. अपूर्वा संगोराम, द्रव्यगुण विभाग अध्यापिका, डॉ. अस्मिता जाधव, डॉ. प्रज्ञा गाठे, डॉ. गौरी गांगल, डॉ. देवाशिष उंब्रजकर तसेच द्रव्यगुण विभागाचे पद्व्युत्तर विद्यार्थी वै.पल्लवी, वै. सीमा, वै. आदित्य, वै. शिवांगी, वै.मेघा, वै.नेहा, वै.अथर्व ,वै.श्रद्धा, वै.देवेश, वै.समिक्षा, वै.सोनल तसेच उद्यानातील माळी श्री. बागुल व श्री मोरे व द्रव्यगुण विभागाचे कर्मचारी श्री.कुंभार यांचा सक्रीय सहभाग होता.

या यशात राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष डॉ. बि.के.भागवत,सचिव डॉ. राजेंद्र हुपरिकर, उपाध्यक्ष डॉ. अतुल कापडी तसेच राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे सर्व पदाधिकारी, प्राचार्य डॉ. सरोज पाटील, उपप्राचार्य डॉ. मिहीर हजरनवीस, उपप्राचार्या डॉ.मीनाक्षी रणदिवे व उपप्राचार्या डॉ. संगीता साळवी यांचे मार्गदर्शन लाभले.

**फोटो.**

| | |
|---|---|
|  महानगरपालिका आयुक्त , पुणे मा. नवल किशोर राम व द्र्व्यगुण विभाग. |  महापौर मा. मंजुषा नागपुरे |
|  डॉ.दिगांबर मोकाट, regional Coordinator RCFC, Pune |  students of European Ayurved Academy |
|  Dr.Anita Kolhe Assistant Director Of Ayurved, Pune. | |